ललितागंडभीर
Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 – 2
Riviera Beach, FL 33504
U. S. A.

# सौदा

मंदारने लग्न करणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती.

तर त्याच्या आईने व आजीने त्याचं शक्य तितक्या लवकर लग्न करायचं अशी प्रतिज्ञा केली होती.

ह्या दोन प्रतिज्ञांमध्ये गेली दोन वर्ष व्दंव्दयुद्ध चालू होतं.

आजीला नातसून हवी होती. आईला सून हवी होती; पण मंदारला लग्नाची शृंखला पायात न घालता बायकांशी खेळायचं होतं.

तसं लग्न करण्याला त्याची तयारी होती पण लग्न झाल्यावर त्याचे 'बाहेरख्याली चाळे' त्याला बंद करायचे नव्हते.

बाहेरख्यालीपणा समाजमान्य झाला असता तर त्याने एका पायावर लग्न केलं असतं. आपलं हे मत आईला व आजीला सांगणं शक्य नसल्याने तो आई आजीने उघडउघड व गनिमी काव्याने केलेले लग्नाचे प्रयत्न या त्या मार्गाने मोडून काढत होता.

आई व आजीशी चाललेलं त्याचं हे व्दंव्दयुद्ध आता अगदी निकराला पोचलेलं होतं. मंदार होता गर्भश्रीमंत घराण्यातला. श्रीमंत बापाचा एकुलता एक मुलगा. त्याची वडिलोपार्जीत इस्टेट होती. मोठा बंगलाही होता. व मोठ्या बहिणींची लग्ने झालेली होती. थोडक्यात वंशदीप मिळण्यासाठी मंदारचं लग्न होणं आता अत्यावश्यक होतं.

सध्या मंदार अँथ्रपॉलॉजीत पीएच. डी करत होता.

त्याच्या जज्ज वडिलांनी अँथ्रपॉलॉजी या विषयाची निवड ऐकून कपाळाला आठ्या घातल्या होत्या. पण मंदारने आपण आज उद्या कुठल्या तरी युनिव्हर्सिटीत अँथ्रपॉलॉजीचा प्रोफेसर होऊ म्हणून छातीवर हात मारून सांगितल्यावर जज्जसाहेबांनी मंदारचं परिवर्तन करण्याचा नाद सोडून दिला होता. प्रोफेसरची नोकरी ती अँथ्रपॉलॉजीत का होईना, मंदारच्या वडिलांच्या दृष्टीने घरासाठी तरी सन्माननीय होती. घराण्याच्या नावाला काळिमा लावल्यासारखं बरंच काही करण्याची कुवत आपल्या दिवट्या चिरंजीवात आहे, याची जज्जसाहेबांना खात्री होती. त्यामुळे अँथ्रपॉलॉजीच्या प्रोफेसरांचा हुद्दा त्यांना स्वीकारणीयच वाटला.

मंदारच्या आईनेही प्रोफेसरची उपाधी भविष्यात आपल्या मुलामागे कधीतरी लागेल हे समजताच त्याच्यामागची "तू पुढे काय करणार?" ही भुणभूण बंद केली व "लग्न कर" ही भुणभूण सुरु केली.

मंदारची आजी मात्र खट निघाली.

“अँथ्रपॉलॉजी म्हणजे काय?” तिने विचारलं.

“म्हणजे उत्खनन करायचं.” मंदारन सांगितलं.

“खड्डे का खणणार तू?”

“साधे खड्डे नाही. जुन्या-पुराण्या वस्त्या गाडल्या गेल्या तिथे खणायचं.”

“तिथ काय उकरणार तू? हाडकं?”

“बरोबर बोललीस. जुनी हाड, भांडीकुंडी, दागिने वैगैरे.”

“हाडकांचं तू काय करणार?”

“अभ्यास........”

“हाडकांचा अभ्यास? दुसरा विषय नाही का सापडला तुला अभ्यास करायला?”

“अग आई, अँथ्रपॉलॉजीला आता महत्व आलंय. हा अँथ्रपॉलॉजीच्या एका भागाचाच अभ्यास करतोय. ह्या भागाला आर्किऑलॉजी म्हणतात. आज ना उद्या तो प्रोफेसर होईल.”

आता आपला जज्ज मुलगाच नातवाची बाजू घेतोय म्हटल्यावर म्हातारीनं वाद बंद केला.

“बरंय. करा हवा तो अभ्यास.” ती म्हणाली, “फक्त माझी हाडे स्मशानात जाण्याआधी नातसून आणा म्हणजे झालं.”

आपल्या हट्टी आईचे अँथ्रपॉलॉजीबाबत समाधान झालेले पाहून जज्जसाहेबांनी सुस्कारा सोडला.

आपल्या चिरंजीवांचा अँथ्रपॉलॉजी हा विषय निवडण्यामागचा अंतर्गत हेतू तेवढासा उदात्त नाही अशी जबरदस्त शंका जज्जसाहेबांना सुरवातीपासून होती. अनुभवांच्या टक्क्याटोणप्यांनी आपलं निदान अचूक आहे असंच त्यांना वाटत होतं.

कारण मंदार जुन्या देवळांना भेटी, उत्खनन, शिल्पांचा अभ्यास अशा निमित्ताने गावोगाव हिंडत होता. या सर्वांच्या अभ्यासाबरोबर तो आणखी एक अभ्यासही करत होता. या अभ्यासाबद्दल मधूनमधून जज्जसाहेबांच्या कानी वार्ता येत. त्यातले खरेखोटं तपासण्यासाठी जज्जसाहेबांनी दोनदा डिटेक्टिव्हही पाठवले होते. प्रत्येक वेळी उडत्या वार्ता सत्य असल्याची ग्वाही त्यांनी दिली होती.

जज्जसाहेबांना समाधान एवढचं होतं की, कधीमधी हात लावण्यापलीकडे बाटलीत मंदारला फारसा रस नव्हता. त्याला छंद होता बाईचा.

त्याला सगळे नमुने चाखून बघायचे होते. मदिरेचे नादिष्ट ज्या रीतीने कॅलिफोर्नियाची, फ्रेंच, इटॅलियन, ड्राम, गोड, गावठी, ताजी अशा वेगवेगळ्या प्रकारची चाखून बघतात त्या रीतीने रसिक मंदारला मदिराक्षींना चाखावयाचा नाद होता.

दोनदा हे प्रकरण मंदारच्या अंगावर शेकलं होतं.

एकदा जज्जसाहेबांना उत्तर प्रदेशातून तार आली होती.

मंदार मार खाऊन हॉस्पिटलात दाखल झाला होता. त्याच्या हाताचं हाड मोडलं होतं.

मंदारनं गावठी मुलीशी संधान जुळवलं व मार खाल्ला अशी बातमी डिटेक्टिव्हने आणली.

एकदा जज्जसाहेबांच्या फॅमिली डॉक्टरचा जज्जसाहेबांना फोन आला होता. डॉक्टर म्हणाले, “मंदाराला गुप्तरोग झाला होता. अर्थात तो माझ्याकडे आला नाही. मुंबईला गेला. पण त्या कन्सल्टंटकडे मी पेशंट पाठवतो. त्यानं मला फोन करून तुम्हाला कळवायला सांगितलं. हा विस्तवाशी खेळ आहे. मंदारला सूचना द्या.”

मंदारला सूचना देऊन जज्जसाहेब थकले होते,

आजवर पत्नीच्या व आईच्या मंदारचं लग्न जुळवण्याच्या प्रयत्नात त्यांनी वधूपरीक्षेला उपस्थित राहण्यापेक्षा फारसा रस घेतला नव्हता.

“कशाला एका मुलीचं आयुष्य या कारट्यापायी उध्वस्थ करायचं,” असा त्यांचा दृष्टीकोन होता. मंदार सुधारण्याची ते वाट पाहात होते.

पण तो क्षण येईना. जज्जसाहेबांना बायकोचं व आईचं टूमण तर असह्य झालं होतं.

शिवाय आजींनी एकदा जज्जसाहेबांना बाजूला घेऊन विचारलंही होतं.

“हा कारटा शेण खातो का बाहेर?”

जज्जसाहेब त त प प करू लागल्यावर ती म्हणाली, “समजलं, कार्टा पणजोबांच्या वळणावर गेला. हे बघ बंड्या, त्याच्या बाहेरख्यालीपणामुळ त्याचं लग्न टाळत असशील तर जन्मभर वाट बघत बसशील. चांगली तिखट बायको आण त्याला. तरच आशा आहे हा सुधारण्याची.”

“पण अशी तिखट मुलगी कुठे मिळणार?” जज्जसाहेबांनी विचारलं.

“ते तुझं तू बघ. सासूबाईसारखी खट हवी. मंदारचा नन्नाचा पाढा ऐकू नकोस. शोधायला लाग.” आईनं फर्मावलं.

आपला नातू बाहेरख्याली आहे हे आपल्या आईला कसं समजलं ह्याविषयी जज्जसाहेब अचंबा करत बसले असताना मंदारची आई वीणाताई घाईघाईने बाहेरून आल्या.

“माझी मैत्रीण राणी परत आपल्या गावात राहायला आलीय. तिची मुलगी लग्नाची आहे. आता राणी दुकानात भेटली होती. सून करून घेतेस का मुलीला म्हणून विचारत होती. मुलगी बरोबरच होती. फारच छान आहे. मंदारपेक्षा उजवीच. गाणंही छान म्हणते म्हणे.”

“मंदारपेक्षा उजवी, अशक्य!” आजी म्हणाल्या.

“तुला आपला नातू म्हणजे मदनाचा पुतळाच वाटतो का ग आई?” जज्जसाहेबांनी विचारलं.

“उंचपुरा, रुबाबदार, धिप्पाड, गोरा, कुरळ्या केसांचा, सरळ नाकाचा साक्षात मदनच आहे तो. तो हाडं उकरतोय एवढाच दोष आहे त्याच्यात.” आजीनं सांगितलं.

जज्जसाहेब पत्नीकडे वळले. “काय ग, ही मुलगी तिखट आहे का?” त्यांनी विचारलं.

वीणाताई भडकल्या.

“अहो मुलगी तिखट का गोड ते एका दृष्टीक्षेपात समजतं का?”

“मला समजेल.” आजीनी सांगितलं, “नीट बघीन तिला.”

त्या रात्री मंदारला आई, आजी व वडील ह्या तिघांनीही तंबी दिली.

“फार मुली नाकारल्यास. आता ही तुला पसंत असो, नसो बोहल्यावर चढावंच लागेल.”

मंदारने गयावया करून तीन दिवसांचा अवधी मागितला. मुलीचं नाव व ती बी.ए.ला आहे एवढी माहिती त्याने आईकडून काढून घेतली. कॉलेजातच तिला बघून येतो असं आश्वासनं दिलं.

“इथे नीट बघ की, कॉलेजात कशाला?” आजीनं विचारलं.

“नैसर्गिकपणे बघायचीय.” मंदारने खुलासा केला.

“म्हणजे?” आजीचे डोळे मुठीएवढे झाले.

“म्हणजे नॅचरली...... म्हणजे इनफॉर्मली...... म्हणजे तिला माहित नसताना.”
मंदारने आपली अडचण लगेच आपल्या दोन जिवश्च कंठश्च मित्रांना फोन करून कळवली.

शेषाद्री हा केमिस्ट्रीत पीएच डी. करत होता तर वीरेन् मराठीत गुंतला होता. हे त्रिकुट, अजून कुणाचंही लग्न झालं नव्हतं म्हणून शाबूत होतं.

शेषाद्री म्हणाला,“ भाग्यश्री...... भाग्यश्री म्हणजे भागी का?”

“भागी..... तुला माहित आहे?”

“दूरची नातेवाईक लागते माझी. खरं तर माझाच डोळा होता तिच्यावर.... पण .... क्षमा करतो तुला.”

“मला कुठं हवीय. घे ना तुला.”

शेषाद्रीला उदारपणे मंदारने स्वतःला नको असलेली भाग्यश्री देऊन टाकली.

“नाही रे ते शक्य!” शेषाद्री म्हणाला, गोत्रबित्र असली भानगड आहे. तिची आईच म्हणाली.”

“मग उद्या कॉलेजात चल आणि दाखव मला ती.”
मंदारची ही विनंती शेषाद्रीने तत्काळ मान्य केली व वीरेनला आमंत्रण दिलं.
दुसऱ्या दिवशी शेषाद्री कॉलेजात पोचला तेव्हाच वीरेनही पूर्वी ठरल्याप्रमाणे दरवाजावर उगवला. वीरेन व शेषाद्री मंदारजवळ पोचले तेव्हा मंदार कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळच्या आंब्याच्या झाडाखालच्या व सायकल स्टँडमधल्या मोक्याच्या जागी उभा राहून आपल्या आवडीचा उद्योग, म्हणजे येणाऱ्या जाणाऱ्या मुलींचं निरीक्षण करत होता. वीरेन व शेषाद्री मुकाट्यानं मंदार शेजारी जाऊन उभे राहिले.

लहानलहान कळप बनवून मुली कॉलेजात प्रवेश करत होत्या.

“जनावर कळप करून राहतात त्याला कारण सुरक्षितता हे असतं. मुलींनी कळप बनवून राहण्यालाही तेच कारण असावं; पण त्यामुळे माझी व माझ्यासारख्या रसिकांची अतिशय पंचाईत होते.” मंदार आपल्या शेजारी उभ्या असलेल्या शेषाद्रीला म्हणाला. शेषाद्रीने जरुरीपेक्षा आवाज चढवून विचारलं, “काय म्हणतोस?”

मंदारने आपलं निरीक्षण क्षणभरच थांबवून शेषाद्रीकडे दृष्टीक्षेप टाकला.

आपण करतोय त्याच उद्योगात शेषाद्री गुंतलाय; फक्त त्याची एकाग्रता आपल्यापेक्षा कितीतरी पटीने तीव्र आहे हे मंदारच्या लक्षात शेषाद्रीच्या अवतारावरून आलं.

आपली लांब काटकुळी मान शेषाद्रीने शक्य तेवढी ताणली होती. टाचा उंचावल्या होत्या. जाड्या भुवया व बारीक डोळे यांचं त्याने आकुंचन केलं होते व एका हाताने डोक्यावर लोंबणारी आंब्याची डहाळी पकडली होती. लांबटांग्या अन काटकुळा शेषाद्री डहाळीच्या आधाराचा उपयोग मान शक्य तितकी उंचावण्यासाठी करत होता. आंब्याची काही पानं अगदी त्याच्या चेहेऱ्यासमोर लटकत होती. पण त्यांचं शेषाद्रीला भान नव्हतं.

मंदार मुलींना विसरला. एकदा शेषाद्री माकडासारखा झाडाला लटकत आहे तर एकदा तो जिराफाप्रमाणे मान लांब करून आंब्याची पानं खातोय असे भास मंदारला झाले.

परिणामी शेषाद्रीकडे बघत त्याने मोठ्यांदी खी खी  करून हसायला सुरवात केली.

शेषाद्रीची तंद्री भंगली नाही.

“शेषाद्री, एवढा तंद्री लावून काय पाहतोयस?”

मंदारने शेषाद्रीच्या पाठीवर एक थप्पड ठेऊन दिली.

तरीही शेषाद्रीने लक्ष दिलं नाही.

“शेषाद्रीची तंद्री, तू यमक जुळवलंस यार!”

शेषाद्रीशेजारी उभा असलेला वीरेन म्हणाला. “द्री असलेला शब्द सांग, कविता करतो.”

वीरेन शीघ्र कवी होता. तो ताबडतोप द्री अक्षर असलेला शब्द शोधू लागला.

“माद्री.” मंदारने शब्द सुचवला व लगेच कविता केली.

“शेषाद्री लावून तंद्री

बघतो आहे माद्री”

ह्या कवितेने शेषाद्रींची तंद्री खरंच भंगली. तो भडकला.

“डोन्ट डिस्टर्ब मी!” तो खेकसला.

“माद्री आता कमीत कमी दोन हजार वर्षाची असेल,” मंदार म्हणाला.

“आली ......ती बघ आली.” शेषाद्री एकदम मान आणखी लांबवून उद्गारला.

“कोण आली ?” माद्री वगैरे विसरून वीरेन व मंदार एकदम बघू लागले.

“तुला सांगून आलेली ती मुलगी.” शेषाद्री म्हणाला.

“कोण भाग्यश्री ?” मंदारने विचारलं.

“हो, तीच!” शेषाद्री म्हणाला.

“पण शेषाद्री काही खूण सांग. या क्षणी इथे पन्नास मुली आहेत.” मंदार अधीरपणाने म्हणाला.

“ह्या सर्व पन्नास मुलीत उठून दिसते ती भाग्यश्री!” शेषाद्री उद्गारला.

“साडी कुठल्या रंगाची नेसलीय ते सांग, यू फूल. पन्नास मुलीत कोण उठून दिसतंय ते झटक्यात मला कसं सांगता येईल?” मंदार म्हणाला.

“ती मला दिसली पण साडी दिसली नाही.” शेषाद्रीने सांगितलं “शिवाय आता काय फरक पडणार आहे? तिचा ठिपका झालाय!”

“चल!” मंदार शेषाद्रीला खेचू लागला.

“कुठे?” शेषाद्रीने विचारलं.

“ठिपक्यामागे!” वाटेतल्या मुलांना धक्के मारत ते तिघे धावू लागले.

दुर्दैवाने ठिपका नाहीसा झाला होता.

दुसऱ्या दिवशी मंदारने आपलं मन भिरकटू दिलं नाही.

लग्नाचा धोका त्याला मुळातच टाळायचा होता. भाग्यश्रीला काय म्हणायचं ते त्याने मनात घोकून ठेवलं होत. ती दिसली की तो ते सगळं बोलून टाकणार होता.

“माझं दुसऱ्या मुलीवर प्रेम आहे.” “वो मेरे बच्चे की मॉ बननेवाली है” वगैरे वगैरे.

भाग्यश्रीनेच माघार घेतली असती अशी त्याची खात्री होती.

शेषाद्रीने ह्या वेळी न विसरता साडीचा रंग बघितला आणि मंदारने धावत जाऊन भाग्यश्रीला हाक मारली.

“भाग्यश्री -----मी मंदार!”

“भाग्यश्री थबकली.”

तिने मागे वळून पहिले.

आणि मंदारच्या काळजाचं पाणी झालं. बच्चेकी माँ बननेवाली अस्ताला गेली.

भाग्यश्री मंद हसली.

माँ बननेवालीला भूमीने दुभंगून पोटात घेतलं.

मंदार इस्पिकचा एक्का असला तर भाग्यश्री हुकुमाची राणी होती.

पाठ करून ठेवलेले शब्द बोलायचे नाहीत हा निश्चय करायला मंदारला क्षणार्धही  लागला नाही. पण त्या शब्दांऐवजी काय बोलावं ते त्याला सुचेना. कधी नव्हे तो स्त्रीसमोर मंदार गोंधळला.

आपल्या समोरचे टपोरे डोळे आपल्याकडे रोखून बघत आहेत व भरीव गुलाबी ओठात मिस्किल स्मित दडलंय, हे लक्षात येताच मंदार आणखीनच गोंधळला.

“मी मंदार” असं आपण सांगताच भाग्यश्री लाजेल व आपल्याकडे चोरटे दृष्टीक्षेप टाकेल अशी मंदारची अपेक्षा होती; पण हे काही भलतंच घडत होतं.

लाजण्या ऐवजी भाग्यश्री रोखून त्याच्याकडे बघत होती. शिवाय मंदारला आपण ज्या रीतीने मुलींकडे बघतो त्या रीतीने ती आपल्याकडे बघतेय, अशी शंका चाटून गेली. त्याच्यावर हा प्रयोग आजवर मुलीकरवी झाला नव्हता.

“मंदारराव बोला. कशाला अडवलंत मला?” भाग्यश्रीने अगदी नाजूक पण उपरोधिक स्वरात विचारलं.

“मंदारराव......” मंदारच्या अंगावर शहारे आले. आपल्या अंगावर धोतर, बटण नसलेला मळखाऊ कापडाचा कोट, डोक्याला काळी सपाट टोपी आहे आणि आपल्या हातात बटाट्यांनी भरलेली गोणपाटी पिशवी आहे असा मंदारला भास झाला.

त्याची दातखिळच उचकटेना. अशा परिस्थितीत होत तेच घडलं. मंदारने सत्यवचनाचा मूर्खपणा केला.

“तू मला सांगून आलीयस.”

“तुम्हालाच नाही. आणखी वीस जणांना तरी सांगून गेलेय मी, माझ्या आईला की नाही वेड लागलंय. कधी एकदा मला उजवतेय असं झालंय तिला. तुमचं काय म्हणणं आहे त्याबद्दल?” डोळ्यांतला मिस्किल भाव तसाच.

“काही नाही. इनफॉर्मली भेटायचं होतं तुम्हाला.”

“अस्सं! मग घ्या बघून मला.”

“माझ्या मित्रांनाही भेटायचंय तुम्हाला.” काय बोलावं हे न सुचून मंदार म्हणाला.

“मित्रांच्या सल्ल्याशिवाय निर्णय नाही वाटतं घेता येत?” खवचट प्रश्न त्याच्या दिशेने आलाच.

“तसं नाही पण ते आलेत बरोबर, म्हटलं भेटतील.” मंदारने आपल्या दुसऱ्या मूर्ख सूचनेवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला.

“काल मी बघितलंय तुमच्या मित्रांना तुमच्याबरोबर. त्यापैकी एकाला आईने मला सांगून नेलं होतं. पण गोत्राने ते फिसकटवलं.”

तिच्या बोलण्याकडे मंदारचं लक्ष नव्हतं. काल हिने आपल्याला एवढ्या गर्दीत कसं बघितलं हेच त्याला समजेना.

पण “तू काल आम्हाला कसं बघितलंय?” हा प्रश्न विचारण्याचा तिसरा मूर्खपणा मंदारने यशस्वीपणे टाळला व दुसरा मूर्खपणा, भाग्यश्रीला शेषाद्री व वीरेनला भेटायला नेण्याचा प्रस्ताव आपण का केला ह्याचा तो विचार करू लागला.

मूर्खपणाचे मनोरेच आज मंदार रचत होता. सुंदर मुलीला बघून तो पाघळला होता.

“माझ्या मित्रांना तुम्ही भेटण्याची एवढी.....जरुरी....आहेसं मला......” असं काही म्हणत तो भाग्यश्रीला मित्रांना भेटायला नेणं टाळू लागला.

पण त्याच वक्तव्य ऐकायला भाग्यश्री थांबलीच नाही. वीरेन व शेषाद्रीच्या दिशेने ती तरातरा चालू लागली व शेषाद्री, वीरेनच्या समोर उभी राहून म्हणाली, “मी भाग्यश्री... तुमचा मित्र मंदार याला माझ्या आईने मला सांगून नेलंय.”

आता मंदारला भाग्यश्रीचं ती दुसरीकडे बघत असताना निरीक्षण करण्याची संधी मिळाली.

तिच्या रोखलेल्या तपकिरी प्रकाशझोताने आपली अशी परीक्षा झाली तशीच शेषाद्रीची व वीरेनची पण होतेय असा दाहक विचार मंदारला चाटून गेला.

त्या दाहक विचारातून मत्सराची नागीण फणा काढून उभी राहिली. एका शुल्लक मुलीमुळे आपल्याला आपल्या मित्रांचा मत्सर वाटावा हा विचार मंदारला झोंबला.

त्या झोंबण्यामुळे मंदारची अस्मिता जागी झाली.

त्याने तोंडावरचं आश्चर्य व गोंधळ पुसून टाकले. त्याजागी खास मुलींवर इंप्रेशन मारण्यासाठी राखणीत ठेवलेली बेपर्वाई पसरली. भरलेले खांदे सरळ केले. थोडंसं सुटलेले पोट आत खेचलं.

हे परिवर्तन चालू असतानाच भाग्यश्रीने मंदारकडे मिस्किल कटाक्ष टाकला. आपले विचार हिने टिपले तर नाहीत ना या शंकेने मंदार वैतागला.

पण या वेळी तो सावध होता. त्याने तोंडावरचा मुखवटा तसांच ठेवला. एवढ्यात त्याच्या लक्षात आलं की शेषाद्री व वीरेन बावळटासारखं भाग्यश्रीकडे बघत उभे आहेत.
तरी काय बोलावं हे त्याला सुचेना. तिघे मित्र “मूकस्तंभांसारखे उभे राहिले. शेवटी भाग्यश्री मंदारकडे वळली, “झालं का तुमच्या मित्रांचं मला बघून?”

“सॉरी!” मंदार जागा झाला. ”हा शेषाद्री, हा वीरेन.” त्याने ओळखी करून दिल्या. “नमस्कार. मी निघते आता. तुमचा निर्णय कळवावा.”

भाग्यश्री दोन पावलं कॉलेजच्या दिशेने चालली. मग तिने मागे वळून बघितलं.

“मग मी माझा निर्णय कळवीन.”

भाग्यश्री जाताच विरेन मंदारकडे वळला.

“तुझ्या सगळ्या मेनका, रंभा, उर्वशी मला माहित आहेत. त्यांच्यापैकी कुणाकडेही बघताना तुझं असं तोंड झालेले मला आठवत नाही. तुझ्या प्रतिज्ञेला तडा गेलाय अशी मला शंका येतेय.”

मंदार काहीच बोलला नाही.

शेवटी शेषाद्रीने विचारलं, “सांगितलंस का तिला बच्चे की माँ वगैरे वगैरे?”

“नाही. मला विचार करायला हवा.” मंदार चाचरत म्हणाला.

“म्हणजे गेलाच प्रतिज्ञेला तडा.” शेषाद्री बोलला, “मी तुला दोष देत नाही. हजारात एक आहे ती.”

“हजारात नाही. कोट्यावधीत. त्याशिवाय मी डळमळलो असतो का?”

“तू लग्न केलंस तर तुझ्या सगळ्या मिस्ट्रेसेसचं काय?” वीरेनने विचारलं.

“तोच विचार करायला हवा.” मंदारने सांगितलं.

मंदारच्या घरी बघण्याचा कार्यक्रम झाला. ह्या वेळी भाग्यश्रीने वेगळंच रूप धरणं केलं होतं. अगदी शालीनतेची पुतळी वाटत होती. मंदारकडे तर बघितलंही नाही. खाली नजर ठेऊन तिने सर्व प्रश्नाची उत्तरं दिली आणि एक भावगीत गोड आवाजात म्हणून दाखवलं.

“मुलगी आव आणतेय खरी मऊपणाचा. चांगली तिखट आहे. आपल्याला हवी तशी.” भाग्यश्री व तिचे आईवडील घराबाहेर पडताच आजीने घोषणा केली.

सगळ्यांनाच वेगवेगळ्या कारणाने आश्चर्याचा धक्का बसला.

“मला तर मऊच वाटली!” जज्जसाहेब म्हणाले.

“मऊ? तू कोर्टात बसून न्यायनिवाडा कर कायद्यानुसार. आतली गाठ समजून घ्यायला बाईच लागते बंड्या.” आजीने सांगितलं.

“मला पण भाग्यश्री मऊच वाटतेय.” वीणाताई म्हणाल्या.

“तू बाईचा जन्म उगाच घेतलास. तुझी सासू आहे म्हणून नोकराचाकरांनी लुटलं नाही तुला. मी जाईपर्यंत तिखट सून येतेय. तेव्हा मला काळजी नाही तुझी.”

मंदारला, “तुला भाग्यश्री तिखट आहे, हे कसं समजलं?” व “तुला नातसून तिखट का हवी?” हे दोन प्रश्न आजीला विचारायचे होते. पण पहिल्या प्रश्नाला आजीने आपल्या आईवडिलांना दिलेली उत्तरं ऐकून त्याने तो प्रश्न न विचारता फक्त दुसरा प्रश्न विचारला.

“आजी, पण आपल्याला तिखट मुलगी हवी असं का म्हणतेस?”

“मेल्या. तू हा प्रश्न स्वतःलाच विचार. तुला लगाम घालायला मऊ बायको चालणार आहे का?” आजीच्या मनुष्य पारखीचा दुहेरी पडताळा मंदारला मिळाला.

“मला का लगाम घालायला हवा?” हा प्रश्न त्याने जिभेवरून परतवला.

विषाची आणि आजीच्या ज्ञानाची परीक्षा घेणं शहाणपणाचं नाही असं मंदारनं ठरवलं.

दुसऱ्या दिवशी मंदार युनिव्हर्सिटीत पोचतो न पोचतो तोच शेषाद्री व वीरेन धावत आले.

“मला मामीने सांगितले की, परवा प्रोफेसर बेवड्याला भाग्यश्री दाखवली.” शेषाद्री म्हणाला.

“काय! कोण ह्या मामी?”

“माझ्या चुलत आते मामी. त्यांना त्यांच्या जावेच्या नणंदेने सांगितलं. तिला तिच्या जावेच्या बहिणीने सांगितलं.” शेषाद्रीने लांबलचक उत्तर दिले.

‘बेवडा’ हे मुलांनी प्रोफेसर रानडे यांना दिलेलं टोपण नाव होतं. आख्ख्या युनिव्हर्सिटीत ते विचित्र व नादिष्ट म्हणून ओळखले जात. त्यांचे लांब केस पुष्कळदा अस्ताव्यस्त पसरलेले असत व ते सतत दारू न पिताही धुंदीत असल्याप्रमाणे वागत असत, म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांना बेवडा हे नाव दिलं होतं.

रानडे फिलॉसॉफीचे प्रोफेसर होते. त्यांचं वय बत्तीसच्या आसपास असूनही ते पंचेचाळीशी उलटल्याप्रमाणे वागत असत, असं सर्वांचं मत होतं. विशेषतः बायकांकडे ढुंकूनही न बघण्याबद्दल त्यांची ख्याती होती.

ते एवढ्या लहान वयात प्रोफेसर झाले ह्याचं श्रेय त्यांच्या रात्रंदिवस काम करण्याला व बायकांविषयीच्या उदासीनतेला आहे,” असं सर्वांचं व त्यातल्या त्यात मंदार, शेषाद्री व वीरेन या त्रिकुटाचं मत होतं.

तशी ह्या त्रिकुटाची व प्रोफेसर रानड्यांची आठवड्यातून दोनदा तीनदा भेट होत असे.

ह्याला कारण टेनिस.

फिलॉसॉफी सोडून रानडे यांना एकच नाद होता. तो टेनिसचा.

शेषाद्री, वीरेन व मंदार या त्रिकुटाची मैत्री टेनिसमुळेच झाली होती. सुरवातीला त्यांना चौथ्या पार्टनरची उणीव भासायची. ती आता रानड्यांनी भरून काढली होती.

अर्थात टेनिस मैत्री टेनिसपुरती मर्यादित होती. ह्या त्रिकुटाचं प्रोफेसरांशी स्कोअर, किती वाजता परत भेटायचं यापलीकडे संभाषणही होत नसे.

“ह्या गद्य माणसाशी भाग्यश्री कशाला लग्न करेल?” मंदारने प्रश्न फेकला.

“ते मला-तुलाच काय पण इतर कुणालाही कळत नाही. पण यांच्या स्थळाविषयी ऐकताच भाग्यश्रीने स्वतःच दाखवून घ्यायचा हट्ट धरला म्हणे.” शेषाद्रीनं सांगितलं.

"मॅड बाई!" मंदारला सात्विक संताप आला. "माझ्यासारखं पंचपक्वान्नाचं ताट समोर असताना त्या तत्वज्ञान्याकडे वळतेय!"

"पुढे ऐक." शेषाद्रीची कथा संपली नव्हती.

"प्रोफेसरांनीही तुझ्यासारखीच लग्न करणार नाही अशी प्रतिज्ञा केलीय म्हणे. अर्थात तुम्हा दोघांच्या प्रतिज्ञेमागचा हेतू वेगळा आहे. बेवाड्यानी फिलॉसॉफीशी लग्न केलंय. तुझ्या प्रतिज्ञेच कारण तुला माहीतच आहे. पण तुमची प्रतिज्ञा एकच आहे. तेव्हा डरो मत यार."

"रानड्यांचीही प्रतिज्ञा भाग्यश्रीला बघताच डळमळली तर?"

वीरेनने दाताखाली ओठ दाबत असलेल्या मंदारकडे बघून विचारलं, आणि लगेच मंदारच्या विचारांचं शिघ्रकाव्यात रुपांतर केलं.

"विश्वामित्रापुढे उभी केली मेनका

लगेच त्याची तपस्या बिपस्या संपली बरं का."

"तुला मराठीत पीएच. डी. मिळाली तर देणाऱ्याला मी महामूर्ख म्हणीन."

मंदारने मनातला राग वीरेनवर काढला.

आपल्याला महिन्यापूर्वीच भेटलेल्या जीवश्च कंठश्च मैत्रिणी बरोबर भाग्यश्री 'पीटर पॅन' ह्या कॉलेजसमोरच्या रेस्टॉरंटमधल्या फॅमिली रूम मध्ये बसली होती.

"आज ना उद्या ते येणारच आणि ते काय बोलतात हे मला ऐकायला मिळणारच." भाग्यश्री राखीला म्हणाली.

"तू म्हणजे विचित्रच आहेस. मुलाचं शिक्षण, पैसा, नोकरी वगैरे बघून मुली लग्नाला होकार देतात. भावी नवरा व त्याचे मित्र यांच्या गप्पा चोरून ऐकायच्या हे काय भलतंच काढलंस तू?" राखी म्हणाली.

"हा माझा जन्माचा प्रश्न आहे." भाग्यश्रीने गंभीरपणानं उत्तर दिलं.

"इतर मुलींच्या जन्माचा प्रश्न नसतो वाटतं?"

"इतर मुली म्हणजे मी नव्हे."

"तू खूप सुंदर आहेस. हा एक मुद्दा आपण सोडू या. बाकी काय फरक आहे तुझ्यात आणि इतर मुलींत ?"

"इतर मुली भावनाप्रधान असतात. मी तशी नाही. मी व्यवहारी आहे. पैसा, डिग्री ही सर्व वरवरची माहिती अर्थात मला मिळालीय. पण मला कॅरेक्टरबद्दल माहिती हवी. ती दाखवण्याच्या वेळात किंवा मी एकटी मंदारबरोबर बाहेर गेले तरी मिळणार नाही. त्यासाठी त्याचं त्याच्या मित्राबरोबर चाललेलं संभाषण ऐकायला हवं. माझ्या भावाच्या मित्रांचं बोलणं ऐकून मी ठरवलंय की, मुलांच्या स्वभावाचे खरे रंग मित्राबरोबरच्या संभाषणातून प्रकट होतात, शिवाय....'

"शिवाय काय?"

"शिवाय मी असं ऐकलंय की मंदारला बाईचा किंवा बायकांचा नाद आहे."

"तो लग्नापूर्वी सर्वांनाच असतो."

“मंदारचा नाद सर्वसामान्य नाही अशी बातमी माझ्या भावाने आणलीय. ह्या बातमीत कितपत तथ्य आहे तेही मला आज समजेल.”

“पण काय ग, त्यासाठी ह्या हॉटेलात असं बसून आपण किती दिवस वाट पाहणार?”

“हे बघ, कॉलेजसमोर बसून मुलींना बघण्याचा कार्यक्रम झाल्यावर ह्या हॉटेलात येण्याचा मंदारचा व त्याच्या मित्रांचा नियम आहे. ते आज ना उद्या येतीलच. ते आले की हेड वेटरला त्यांना शेजारच्या खोलीत आणून बसव म्हणून मी सांगितलंय. चक्क पैसे चारलेत मी त्याला ..... शू ....” भाग्यश्रीने ओठावर बोट ठेवलं.

“काय? आले का ते?” राखीने आवाज उतरवला.

“हो शेजारच्या फॅमिलीरूम मधून शेषाद्रीचा भसाडा आवाज येतोय.” भाग्यश्री पुटपुटली.

शेजारच्या फॅमिलीरूम मधून सुरवातीची शेषाद्रीने दिलेली ऑर्डर दोघी मैत्रिणींच्या कानावर पडली. नंतर लगेच भाग्यश्रीच्या अपेक्षेप्रमाणे चर्चा सुरु झाली.

“मग मंदार, प्रतिज्ञा मोडण्याचा निश्चय पक्का ना?” वीरेनने विचारले.

“पक्का! भाग्यश्रीसारखी परत कोण सापडेल मला?”

“मग तुझ्या रिसर्चचं काय?” वीरेनने विचारलं. “कुठलं रिसर्च म्हणतोस? अँथ्रपॉलॉजीचं चालू राहील. - दुसरं तात्पुरत बंद.”

“तात्पुरतं? म्हणजे?” शेषाद्रीचा प्रश्न.

“म्हणजे लग्न करायचं. भाग्यश्रीच्या गळ्यात तीन पोरांचं लोड अडकवलं की मग मी मोकळा. तीन पोरांची आई काही आपल्या तीन पोरांच्या बापाला घटस्फोट देत नाही. आयुष्याच्या त्या स्टेजला फायनॅनशियल गरज महत्वाची होते.”

“बरोबर आहे. स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळाची माता असते.” वीरेन गंभीरपणे म्हणाला.

“बाप हा पण जन्मोजन्मीचा बापच असतो पण अनेक इतर बायकांचा लव्हरही असू शकतो.” मंदार म्हणाला.

“राखी, माझं काम झालं. चल, जाऊ या!” भाग्यश्री उठली.

“भाग्यश्री, चप्पल काढ आणि दे ठेऊन गालावर!” राखी फुणफुणली.

“माझ्या हातात नकाराचा बॉम्ब आहे. त्याचा होकार आला की मी तो फेकीन. बायकांना खेळवतोय काय?”

हॉटेलातून बाहेर पडताना भाग्यश्रीने शंभराच्या दोन नोटा हेड वेटरच्या हातात सरकवल्या.

“मग तू नकार कधी कळवणार?” राखीने हॉटेलातून बाहेर पडताच विचारलं.

“अजून विचार करायला हवा.” भाग्यश्री म्हणाली.

“विचार? अशा माणसाबरोबर लग्न करणार का नाही हा विचार.”

“राखी, मी अगदी व्यवहारी बाई आहे. प्रेमाबिमात पडून मी लव्ह मॅरेज केलं असतं, तर गोष्ट वेगळी. पण इथे तर चक्क सौदा चाललाय. शरीराचाही. तेव्हा व्यवहारी दृष्टीने विचार

करणं शहाणपणचं. त्याच्याकडे काय आहे किंवा रानड्यांकडे काय आहे ते चक्क एका तराजूत टाकायचं."

"म्हणजे मंदरचं पारडं जड झालं तर त्याची ही बडबड ऐकूनही तू त्याच्याशी लग्न करशील?"

"मी गरीब असते किंवा कुरूप असते किंवा पांगळी असते तर केलं असतं. उगाच भावनांच्या आहारी जायचा माझा स्वभाव नाही. प्रोफेसर रानड्यांना आणि ह्या मंदारला दोन पारड्यात घालतेय. कोणाचं पारडं जड जातयं बघतेय."

"हो? कोणाचं?"

"रानड्याचे."

"ते कसं?"

"सांगते. मंदार रानड्यांपेक्षा दिसायला उजवा आहे. हुशारही आहे. तसा श्रीमंतही आहे म्हणे. पण खरं सांगू, गर्भश्रीमंतीचा नेम नाही. टिकेल न टिकेल. तो बहुतेक प्रोफेसर होईल. पण नाही झाला तर? रानडे आत्ताच प्रोफेसर आहेत. सुस्थितीत आहेत. शिवाय त्यांना कामाचा नाद आहे. ते माझ्या पथ्यावर पडणार आहे."

"ते कसं?"

"कसं? अगं माझ्या गाण्याचा छंद तुला माहित आहेच. ते कामात अडकले की गाण्यात वेळ घालवीन. मोकळीक हवीय मला नवऱ्यापासून. शिवाय माझ हे रूप टिकेल याची काय गॅरेंटी? उद्या मंदारला एखादी ब्युटी भेटली तर तो देईल मला सोडून. प्रोफेसरांकडून तो धोका नाही."

"हद्द झाली तुझी. भावनाबिवना नाहीत तुला."

"आपण चक्क बाजार मांडलाय. उगाच भावनांचं नाटक कशाला?"

"मग जज्जसाहेबांना नकार कधी कळवणार?"

"मंदार नालायक असला तरी जज्जसाहेब देवमाणूस आहे. मुलगा पसंत नाही म्हणून मी नकार दिला तर त्यांचा इन्सल्ट होईल. म्हणून मी पत्रिका वगैरे काही सांगून मोडता घालायला लावीन आईला."

"म्हणजे? त्यांचा होकार आल्यावर नकाराचा बॉम्ब वगैरे..... त्यांचं काय?"

"ते आपलं बोलायचं. जज्जसाहेबांसारख्या बड्या माणसाशी चांगले संबंध ठेवलेले बरे."

भाग्यश्रीचे वडील येऊन पत्रिकेविषयी सांगून गेल्यावर जज्जसाहेब, आई, आजी व मंदार सगळेच गंभीर झाले.

"पोरगी नुसती तिखटच नाहीय; पण माणसांची परीक्षाही आहे हो तिला." आजी मंदारकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकत म्हणाल्या.

पूर्व प्रसिद्धी : साहित्य शिवार, दिवाळी १९९०.